**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग दोन**

**मंगळवार, दिनांक ५ डिसेंबर, २०२३/अग्रहायण १४, १९४५ शके**

**१४५.** महाराष्ट्र विधानसभा नियम १०६ (३) अन्वये शुक्रवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी सभागृहात चर्चेसाठी घेण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांच्या सूचना :-

(१) **श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांचा ठराव क्र. २४९**

"मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्हयांसह महाराष्ट्र राज्याला ७२० कि.मी.चा समुद्रकिनारा लाभलेला असणे, सदर जिल्हयातील जनतेचे मासेमारी हे प्रमुख उत्पन्नाचे व जिवीताचे साधन असतानादेखील मत्स्य विद्यापीठाचे मुख्यालय नागपूर येथे असल्याने त्यांना सोईचे नसणे, मा.खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मत्स्य विद्यापीठाचे मुख्यालय कोकणात असावे अशी शिफारस केलेली असणे, सदर शिफारसीची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२) **डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांचा ठराव क्र. १६२**

"शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांचा ठराव क्र. २९**

"राज्यात निरनिराळया विभागात येणाऱ्या प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी प्रकल्प सुरु होण्याआधी प्रकल्पग्रस्तांचे योग्यप्रकारे पुनर्वसन करण्याबाबतचा आराखडा राज्य शासनाने तयार करुन केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४) **श्री. शिरीष चौधरी, वि.स.स. यांचा ठराव क्र. १५५**

"राज्यातील सर्व महामार्गावर रहदारी ही मोठया प्रमाणावर वाढली असून त्याचे योग्य नियोजन न होणे, अरुंद रस्ते, वळणे यामुळे अपघातांचे वाढते प्रमाण, त्यात होत आलेली मनुष्य व वित्तहानी पहाता यावर उपाय म्हणून सर्व राज्य महामार्ग व त्या महामार्गांना जोडणाऱ्या रस्त्यांचे चौपदरीकरण करावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५) **श्री. रवींद्र धंगेकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. १४९**

"पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर या पाच जिल्हयातील जनतेच्या सोयीसाठी मुंबई उच्च न्यायालयाचे एक खंडपीठ पुणे येथे स्थापन करावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
**नागपूर,**
**दिनांक : ५ डिसेंबर, २०२३**

**जितेंद्र भोळे**
**सचिव- १ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत:**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
३. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
४. संगणक कक्ष (website)